# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/10/2023 (मंगळवार) दुपार

---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या इसमांविरूद्ध कारवाई**
**वाहनासह एकुण १,२२,६००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त**
**पोलीस स्टेशन खापाची कारवाई**

दिनांक ०९/१०/२०२३ रोजी पोलीस स्टेशन खापा येथील स्टॉफ यांनी पोस्टे. परीसरात पेट्रोलींग करीत असता मुखबीर द्वारे खबर मिळाली कि, मौजा खैरी नाला येथे एक छोटा हाती पिकअप मध्ये काही इसम विनापरवाना अवैधरित्या रेती उत्खनन करुन चोरी करीत आहे. अशा मिळालेल्या खबरेवरुन पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता मौजा खैरी नाला येथे एक पांढऱ्या रंगाचा छोटा हाती पिकअप मधील रेती भरणारे इसम पोलीसांना पाहुन पिकअप मधील काही रेती खाली करुन पिकअप गाडीसह घेवुन पळु लागले तेव्हा त्यांचा पाठलाग करुन जवाहर टी पॉईट खापा येथे छोटा हाती पिकअप गाडीला थांबवुन सदर छोटा हाती पिकअप गाडी क्र. एम.एच. ३१ सी. क्यु. ४४२३ ची पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे अर्धा ब्रास रेती व तीन पावडे व तीन प्लास्टीक घमीले दिसुन आले. सदर पिकअप मधील रेती बाबत चालकास विचारपुस केली असता त्यांनी सदर रेती खैरी पंजाब नाला येथुन भरुन खापा येथे नेत असल्याचे सांगितले. छोटा हाती पिकअप क्र. एम.एच. ३१ सी. क्यु. ४४२३ किमंती अंदाजे १,२०,०००/— रुपयाचे व सदर पिकअप चालकास त्याचे नाव गाव पत्ता विचारले असता त्याने आपले नांव क्रिष्णा दशरथ खुबाळकर, वय २६ वर्ष, रा. किल्लापुरा खापा असे सांगीतले व सदर पिकअपमध्ये रेती भरणारे मजुर यांनी आपले नांव १) सोनु भालुराम कुंभरे वय २४ वर्ष रा. पाढुर्णा ह.मु. खापा २) अतुल प्रकाश उईके वय १८ वर्ष रा. पाढुर्णा ह. मु. खापा ३) राजा कालुराम कुंभरे वय २१ वर्ष रा. पाढुर्णा ह. मु. खापा ता. सावनेर जि. नागपुर असे सांगीतले. सदर आरोपी हे अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरी करुन वाहतुक करतांना मिळुन आल्याने सदर रेतीबाबत रॉयल्टी किंवा परवाना आहे काय असे विचारले असता त्यांनी कोणत्याच प्रकारचे परवाना नसल्याचे सांगीतले. आरोपीतांच्या ताब्यातून छोटा हाती पिकअप क्र. एम.एच. ३१ सी. क्यु. ४४२३ किमंती अंदाजे १,२०,०००/— रुपये व त्यामध्ये अंदाजे अर्धा ब्रास रेती किमंती २०००/— रु. व तीन प्लास्टीक घमीले किंमती ३००/— रु. व तीन पावडे किंमती ३००/— रु. असा एकुण किमंती १,२२,६००/— रु. मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोशि पन्नालाल बटाऊवाले पोस्टे खापा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द ३७९, ३४ भादंवी सहकलम ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा पाटील मो. क्र. ८८०५० २५३४७ हे करीत आहे.

# विनयभंग

**पो.स्टे. सावनेर :—** दिनांक ०९/१०/२०२३ चे ११.०० वा. ते १९.०० वा. दरम्यान फिर्यादी व आरोपी नामे— श्रवण केशव बकसरे, रा. सावनेर हे एकमेकांचे घराशेजारी राहतात. यातील फीर्यादी ही आपल्या घरी हजर असता आरोपी हा फिर्यादीच्या घरी येवुन तु माझा फोन ब्लॅक लिस्ट मध्ये का टाकला असे म्हणुन आरोपी याने फिर्यादीचे हात पकडले यावरून फिर्यादीने हात सोडवून घराचे बाहेर आली तेव्हा आपल्या पती व सासरे यांना पूर्ण हकीकत सांगीतली असता फिर्यादीचे सासरे यांनी आरोपीस हटकले असता फिर्यादीचे सासरेला आरोपी याने घराजवळ पडलेली काठी हातात घेवुन फिर्यादिचे सासऱ्यांचे डोक्यावर मारली त्यामुळे फिर्यादीचे सासऱ्याचे डोके फुटुन रक्त निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द ४५१, ३५४, ३५४(ड), ३२४ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार बंडु कोकाटे मो. नं. ९८२२९४३६०५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**